# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
**वार्षिक सर्वसाधारण सभा**

दिनांक 08 नोव्हेंबर 1993

उपरोक्त संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 28 नोव्हेंबर 1993 रोजी स्थळ शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई – 400 012 या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे तरी सर्व सभासद बंधुनी सायंकाळी 5:00 वाजता वेळेवर उपस्थित राहण्याची कृपा करावी.

हि नम्र विनंती,

सभेपुढील कामे

1) सभेच्या अध्यक्षांची निवड
2) दिनांक 12 में 1991 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे
3) दिनांक 18 एप्रिल 1991 ते नोव्हेंबर 1993 या कालावधीत चिटणीसांनी केलेल्या अहवालास मंजूरी
4) 1991 ते 1993 या जमाखर्चास मंजूरी
5) फळसेवाडी परस्पर हितकारी संस्था, मुंबई – 400 013, या संस्थेचे नोंदणिकृत नाव, फळसेवाडी हितकारी संस्था यांस मान्यता देऊन त्यांची वार्षिक वर्गणी व प्रवेश फी ठरविणे (रु.24/- वर्गणी रु.1/-)
6) पुढील कालावधीसाठी कार्यकारीणीची निवड
7) कार्यकारीणी पुढील ध्येय धोरणे ठरविणे
8) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय

सुनिल सदानंद राणे
चिटणीस

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(25 to 31)

<u>**फळसेवाडी हितकारी संस्था**</u>

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

**दिनांक** : रविवार 28 नोव्हेंबर 1993
**स्थळ** : शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई – 400 012.

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 11. श्री हेमंतकुमार रमेश राणे |
| 2. श्री रामकृष्ण भगवान राणे | 12. श्री श्रीधर आत्माराम राणे |
| 3. श्री यशवंत तुकाराम सावंत | 13. श्री मधुकर संभाजी राणे |
| 4. श्री साबाजी त्रिंबक राणे | 14. श्री दत्ताराम विष्णु साटम |
| 5. श्री वासुदेव बाबू राणे | 15. श्री अविनाश कृष्णाजी राणे |
| 6. श्री वसंत भिकाजी राणे | 16. श्री अविनाश बाळकृष्ण राणे |
| 7. श्री प्रताप विठोबा राणे | 17. श्री पांडूरंग साबाजी राणे |
| 8. श्री उदय भगवान राणे | 18. श्री सुरेश रघुनाथ राणे |
| 9. श्री मधुसूदन श्रीधर राणे | 19. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 10. श्री सत्यविजय शिवराम राणे | |

उपरोक्त संस्थेची बैठक रविवार दिनांक 28 नोव्हेंबर 1993 रोजी शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई – 400 012 येथे ठिक 5:45 वाजता अध्यक्ष श्री प्रताप रावराणे यांच्या उपस्थितीत सुरू झाली. या सभेस वरील 19 सभासद उपस्थित होते. सभेची आमंत्रणे सर्वांनी पाठविली याची सभाग्रहास माहीती देण्यात आली. अध्यक्षांनी विषय पत्रिके प्रमाणे कार्यक्रमास सुरू करण्यापूर्वी सभाग्रहास अशी विनंती केली की जे सभासद व कुटूंबिय यांची देवाज्ञा झाली आहे (गेल्या 3 वर्षात) अश्या सर्व मृतात्म्यांना दोन मिनीटे उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

यानंतर आर्दश शिक्षक म्हणून राष्ट्रपती पुरस्कार विजेते संस्थेचे सभासद सुपूत्र श्री साबाजी त्रिंबक राणे यांचे फुल ना फुलाची पाकळी या नात्याने पुष्पमाला अर्पण करून संस्थेच्या वतीने अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर विषय पत्रिकेप्रमाणे सेक्रेटरीनी मागील सभेचे इतिवृत्त वाचन केले व त्यानंतर हे इतिवृत्त सभाग्रहाने मंजूर केले.

यानंतर चिटणीसांनी गेल्या 3 वर्षात केलेल्या कामाचा अहवाल जो पूर्वी सर्व सभासदांना देण्यात आला त्याबद्दल कोणा सभासदाची काही शंका आहे किंवा त्याबद्दल विचारणा करण्यात आली. यावर सन्माननीय सभासद श्री दत्ताराम विष्णु साटम यांनी हा अहवाल / त्रैवार्षिक शब्द यावर काही शंका मांडल्या. काही शंकाचे निराकरण केल्यानंतर हा अहवाल सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

यानंतर विषयपत्रिके प्रमाणे चिटणीसांनी जानेवारी 1991 ते नोव्हेंबर 1993 पर्यंतचा जमाखर्च सभाग्रहात सादर केला व त्यानंतर ऑडिट रिपोर्टही वाचून दाखविण्यात आला. या जमाखर्चावर साधक-बाधक चर्चा केल्यानंतर हा जमाखर्च मंजूर करण्यात आला.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(25 to 31)

यानंतर सन 1991 (12 जानेवारी) साली भरविण्यात आलेल्या स्नेहसंमेलनाचा खर्च सभाग्रहाकडे सादर करण्यात आला. या जमाखर्चावर साधक-बाधक चर्चा झाली. सन्माननीय सभासद श्री अविनाश कृष्णाजी राणे यांनी असे मत मांडले की आपण जाहिरातेव्दारे पैसे उभे करणार होतो व अश्या तऱ्हेने उभारलेले पैसे काटकसरीने वापरून आपण विहीरीसाठी वापरणार होता. परंतू आपण केलेल्या स्नेहसंमेलनाच्या खर्चावर आपण तेवढे पैसे वाचवू शकलो नाहीत. परंतू याबाबतीत कार्यकारीणीस हे शक्य झाले नाही.

श्री दत्ताराम विष्णु साटम व श्री अविनाश कृष्णाजी राणे यांनी अशी सूचना केली की हा खर्च संस्थेच्या अकाऊंन्टमध्ये एकत्रित दाखविला पाहिजे होता, स्वतंत्र दाखविण्याची गरज नव्हती. परंतू चिटणीसांनी असे सांगितले सभासदांच्या माहीतीसाठी आम्ही तो स्वतंत्रपणे दिला. तसेच काही सन्माननीय सभासद श्री वासूदेव बाबू राणे, श्री दत्ताराम विष्णु साटम, श्री मधूकर संभाजी राणे व श्री यशवंत तुकाराम सावंत यांनी हा स्नेहसंमेलनाचा खर्च अनाठायी केला अशी बाजू मांडली. याबाबतीत आपण कार्यकारी मंडळ व सल्लागार मंडळ यांचा कोणताही सल्ला घेतला नाही अश्या तऱ्हेची नाराजी व्यक्त केली. श्री सुरेश रघुनाथ राणे यांनी असे पुढे सूचित केले की नविन विहीर बाबत आता पुढे खर्च करू नये. तसेच सन्माननिय सभासद श्री अविनाश कृष्णाजी राणे यांनी असाही शेरा दिला की स्नेहसंमेलनाचा उध्देश असफल ठरला आहे. तसेच पुढे आणखी अशी सूचना केली की संस्था व स्नेहसंमेलन खर्च एकत्र करता येईल का ? याबाबत रजिस्ट्रेशन विभाग यांच्याकडे आवश्यक असल्यास चौकशी करावी व हा खर्च आवश्यक असल्यास एकत्र करावा. व यानंतर हा जमाखर्च मंजूर करण्यात आला.

यानंतर 10 जानेवारी 1991 रोजी घेतलेल्या संस्थेच्या रजिस्ट्रेशनबद्दल चर्चा झाली. यावेळी सन्माननिय सभासद श्री साबाजी त्रिंबक राणे यांनी असे मत व्यक्त केले की जर रजिस्ट्रेशन पूर्वी संस्थेची घटना (बायलॉज) उद्धिष्टे सभाग्रहापुढे मांडून मंजूर केली असती तर अधिक बरे झाले असते अशी सूचना मांडली. या सर्व गोष्टीवर साधक-बाधक चर्चा होऊन पुढील कालावधीसाठी रजिस्ट्रेशन केल्याप्रमाणे संस्थेचे नाव "फळसेवाडी हितकारी संस्था" असे सर्वानुमते मंजूर होऊन पुढील कालावधीसाठी त्याची मासिक वर्गणी व प्रवेश फी याच्यावर चर्चा झाली. सन्माननिय सभासद श्री दत्ताराम विष्णु साटम यांनी अशी सूचना मांडली की सन 1994 सालापासून रु.24 + रु.1 प्रवेश फी अशातऱ्हेची पावती प्रत्येक सभासदाची बनवावी. अशी ही चर्चा करण्यात आली की जे सभासद निवृत्त झाले आहेत त्यांच्यावर असलेली बाकी वर्गणी व कर्ज आता सोडून देण्यात यावे.

यानंतर सहाव्या मुद्याप्रमाणे नवीन कार्यकारीणीची निवड करावी अशी सूचना अध्यक्षांनी मांडली. परंतू यावर सभाग्रहाने असा निर्णय दिला की ही निवडणूक एप्रिल / मे मध्ये पुन्हा सभा बोलावून घ्यावी व तो पर्यंत पुढील कालावधीसाठी लागणारे सभासद फार्म, मिनीटबूक, सभासद लिष्ट, पावती पुस्तके इत्यादि सर्व तयारी करावी व पुढील कालावधीसाठी निवडणूक घेण्यापूर्वी तसे परिपत्रक द्यावे. तसेच सध्या असलेल्या कार्यकारीणीने कार्यभार सांभाळावा.
पुढील ध्येयधोरणे नवीन मंडळाने ठरवावीत असे ठरले.

अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय –
यामध्ये ब्राह्मण विहीर रिपेअरींग व ब्राह्मण मंदिर चौथरा यावर चर्चा झाली. ब्राह्मण विहीर रिपेअरींगसाठी जो खर्च येईल तो सर्व संस्थेमार्फत भरावा अशी सूचना सर्व सभासदांनी दिली.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(25 to 31)

ब्राह्मण मंदीर चौथरा या संदर्भात सर्व बाजूनी साधक-बाधक चर्चा झाली. श्री वामन राजाराम राणे गावातील रहिवाशी बंधू यांची अशी इच्छा आहे की हा चौथरा / मंदिर लवकरात लवकर व्हावा व चौथरा / मंदिर उभारते वेळी श्री वामन राजाराम राणे यांनी पूर्ण लक्ष देण्याची जबाबदारी घेतली आहे. अश्यावेळी संस्थमार्फत यासाठी देणग्या स्विकाराव्यात व देणगीगारांची नावे त्या ठिकाणी एक पाटी बनवून लावावी असे ठरले. यासाठी चिटणीसांनी लवकरात लवकर एक परिपत्रक काढावे असा निर्णय घेण्यात आला.

सायंकाळी 7:45 पर्यंत ही सभा चालली. विविध इतर जिव्हाळ्याच्या विषयांवर चर्चा झाली. या सभेचा चहापाण्याचा खर्च श्री सत्यविजय शिवराम राणे यांनी केला याबद्दल संस्था त्याची आभारी आहे.

यानंतर ही सभा 7:45 वाजता समाप्त झाली. याप्रसंगी चिटणीसांनी सर्व सभासद बहूमुल्य वेळ देऊन उपस्थित राहीले त्याबद्दल आभार मानले. तसेच शिरोडकर शाळेने वर्ग उपलब्ध करून दिल्याबद्दल आभार मानले. तसेच श्री सत्यविजय शिवराम राणे यांचे चहापाण्याच्या खर्चाबद्दल आभार मानले. तसेच याप्रसंगी श्री साबाजी त्रिंबक राणे यांचा राष्ट्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल आपल्या कणकवली तालूक्यामध्ये जाहीर सत्कार व्हावा अशी इच्छा व्यक्त करून ही सभा संपली असे चिटणीसांनी जाहीर केले.

---

श्री सुनिल सदानंद राणे
चिटणीस

श्री प्रताप विठोबा राणे
अध्यक्ष

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(25 to 31)